**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.६५४, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०२२५९६/२२७९४११६ Email ID : vanita.shirsat@nic.in

---

क्रमांक : निविआ-४०२४/प्र.क्र. ३०/का.१४२१. दिनांक : १०.०७.२०२४.

## निविदा सूचना

**बाह्यंत्रणेमार्फत मनुष्यबळ (वाहनचालक व शिपाई) पुरविणाऱ्या संस्थांकडून निविदा मागविण्याबाबत..**

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई कार्यालयाकरिता २ वाहनचालक व २ शिपाई पुरवठा आदेश दिल्याच्या दिनांकापासून १ वर्ष कालावधीकरिता भरण्याकरिता बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्थांकडून स्पर्धात्मक पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

सदरची जाहिरात संक्षिप्त स्वरुपात असून, सविस्तर जाहिरात व निविदा भरण्यासाठीच्या आवश्यक सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा द्वी लिफाफा पध्दतीची राहील. १. तांत्रिक लिफाफा २. व्यापारी लिफाफा.

निविदा भरण्याचा कालावधी दि. १०.०७.२०२४ ते २३.०७.२०२४ (सायं.६.१५ वा.) पर्यंत राहील.

| अ.क्र. | कार्यक्रम | तपशील |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन निविदा प्रसिध्दी दिनांक | १०.०७.२०२४ |
| २ | ऑनलाईन निविदा डाऊनलोड करुन सादर करावयाची प्रारंभिक दिनांक | १०.०७.२०२४ |
| ३ | ऑनलाईन निविदा सादर करावयाची अंतिम दिनांक | २३.०७.२०२४ |
| ४ | तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक | २४.०७.२०२४ (फेरबदल झाल्यास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.) |
| ६ | आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक | २४.०७.२०२४ (फेरबदल झाल्यास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.) |
| ७ | कंत्राटाचा कालावधी | १ वर्ष |
| ८ | निविदा दस्तऐवज फी | रु.२,००० (ना परतावा) ही ऑनलाईन प्रदानाद्वारे भरावी. |
| ९ | बयाना रक्कम | रु.१०,०००/-ही ऑनलाईन प्रदानाद्वारे भरावी. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| १० | सुरक्षा ठेव | एकुण कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधीसाठी होणाऱ्या एकुण मानधनाच्या ३ टक्के रक्कम |
| ११ | संपर्क व्यक्ती आणि दुरध्वनी क्रमांक | कार्यासन अधिकारी (आस्थापना), नियोजन विभाग, ६ वा मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई-३२<br>दुरध्वनी क्रमांक.<br>०२२-२२०२२५९६/२२७९४११६ |

कोणतेही कारण न देता निविदा नाकारणे किंवा अपात्र अधिकार अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

(नंदकुमार राऊत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner

## नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

नियोजन विभागात मासिक दरावर १ वर्षाच्या कालावधीकरिता २ वाहनचालक (कुशल) व २ शिपाई (अकुशल) कर्मचारी आवश्यकतेनुसार मनुष्यबळ पुरवठाधारक संस्थांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. त्यासंबधीच्या संस्थेस लागू असलेल्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे:-

### तांत्रिक लिफाफा

निविदा काराने तांत्रिक निविदा मधील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल.

१. उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या शासन निर्णय क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४., दि.०१.१२.२०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२. सदर शासन निर्णयातील नियम क्रमांक ६ अंतर्गत परिशिष्ट ६.८ मध्ये स्पर्धेत भाग घेणाऱ्या निविदाकाराने भरावयाच्या निविदा शुल्क ना-परतावा आणि बयाणा रक्कमेचा तपशील दिलेला असून ५ लाख ते १० लाख पर्यंतच्या अंदाजित किंमतीसाठी स्पर्धेत भाग घेणाऱ्या निविदाकाराने निविदा फी रु.२०००/- आणि १००००/- बयाणा रक्कम यांचा भरणा करणे आवश्यक राहील. निविदा शुल्क व बयाणा भरण्यापासून विहित निकषानुसार सूट असल्यास त्याबाबतचे नजिकच्या काळातील सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र संबंधित निविदाकाराने निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

३. सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.

४. सदर शासन निर्णयातील नियम क्रमांक ४.६ नुसार यशस्वी निविदाकारास खरेदी प्राधिकाऱ्याकडे आदेशाच्या मुल्याच्या (एकुण रकमेच्या) ३ टक्के इतकी रक्कम अनामत ठेव म्हणून डिमांड ड्राफ्टद्वारे अथवा राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीद्वारे विहित नमुन्यात सदर शासन निर्णयातील (परिशिष्ट१० नुसार) निविदा स्विकृतीच्या आदेशापासून १५ दिवसांच्या आत सुपूर्द करणे आवश्यक आहे.

५. सेवा पुरवठादार संस्थेच्या नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत तसेच कार्यालयाच्या नोंदणी संदर्भातील दस्तऐवजांच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील.

६. निविदेच्या अंतिम तारेखपर्यंत ग्राह्य असलेले आयकर भरल्यासंबंधीच्या प्रमाणपत्राची प्रत तसेच मागील ३ वर्षाची आयकर प्रमाणपत्रे व पॅनकार्डची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. नव्याने सुरु करण्यात आलेल्या संस्थांबाबत ३ वर्षाची आयकर प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक असणार नाही.

Scanned with CamScanner

७. निविदाकाराचे नाव काळ्या यादीत नसलयाचे व निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रु.१००/- चे बॉन्ड पेपरवर प्रमाणित करणे आवश्यक आहे.

८. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात जीएसटी भरल्याचे विवरणपत्र तसेच वर नमूद केलेल्या आवश्यक कागदपत्रांमध्ये शासनास आवश्यक वाटल्यास अधिक कागदपत्रांची तसेच मूळ कागदपत्रांची मागणी करण्यात येईल व निविदाकारास मागणीनुसार ती कागदपत्रे पडताळणीकरिता सादर करणे बंधनकारक राहील.

९. मागील ३ वर्षाच्या कालावधीत ज्या कार्यालयांसाठी बहुउद्देशिय अकुशल/कुशल पदासाठी मनुष्यबळ पुरविण्यात आले, त्याबाबतची संस्थेची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. सदर अट नव्याने सुरु करण्यात आलेल्या संस्थेच्या बाबतीत शिथिल करण्यात येत आहे.

१०.मागील ३ वर्षाची संस्थेची आर्थिक उलाढाल सादर करणे आवश्यक आहे.सदर अट नव्याने सुरु करण्यात आलेल्या संस्थेच्या बाबतीत शिथिल करण्यात येत आहे.

११. दुकाने व व्यवसायिक संस्था अधिनियम १९४८ नुसार वैध नोंदणी प्रमाणपत्र, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९४८ नुसार नोंदणी प्रमाणपत्र व राज्य कामगार विमा कायद्यानुसार नोंदणी प्रमाणपत्र यांची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

१२. तांत्रिक लिफाफामध्ये सादर केलेले व अपलोड केलेल्या कागदपत्रांची यादी निविदाकाराने स्वत:च्या लेटरहेडवर वर सादर करावे.

१३. निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम ही DDO PLANNING DEPARTMENT MANTRALAYA,MUMBAI यांच्या नावाने डिमांड ड्राफ्ट काढण्यात यावा व त्याची प्रत जोडण्यात यावी.

Scanned with CamScanner

## आर्थिक लिफाफा

१. निविदाधारकाने www.maharshtra.gov.in या वेबसाईटवरील निविदेत नमूद केल्याप्रमाणे वाहनचालक पदांकरिता परिशिष्ट १ व शिपाई सवंर्गाकरिता परिशिष्ट २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मासिक दर नमूद करावेत.

२. किमान मासिक वेतन अधिनियम १९४८ अन्वये परिमंडळ १ साठी उद्योग उर्जा व कामगार विभाग अधिसूचना दि. २४.०७.२०१९ व किमान वेतन कायद्यानुसार कामगार आयुक्त कार्यालयाने लागु केलेल्या किमान वेतन दरानुसार कंत्राटदारास वेतन देणे बंधनकारक राहिल.

Scanned with CamScanner

# अटी व शर्ती

१. पुरवठादार संस्थेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता १० वी पास व मराठीचे ज्ञान आवश्यक आहे. मराठी लिहिता, वाचता व बोलता आली पाहिजे. कर्मचारी भारताचा नागरिक असावा.

२. पुरवठादार संस्थेमार्फत नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. (उदा.शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, पॅनकार्ड च्या स्वसाक्षांकित प्रती, कायम व सध्याचा निवासी पत्ता, नमूना स्वाक्षरी तसेच पासपोर्ट साईज फोटो इ.)

३. पुरवठादार संस्थेकडून पुरविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वय १८ ते ४३ वर्ष असणे आवश्यक आहे.

४. कर्मचाऱ्यांचा पोलीस तपासणी अहवाल देणे बंधनकारक आहे.

५. या सेवेमध्ये नियुक्त करण्यात येणारे कर्मचारी तात्पुरते आणि करार तत्त्वावर नियुक्त केलेले असतील आणि ज्या पदावर ते काम करतील त्या पदावर त्यांचे कोणतेही भावी हक्क नाहीत.

६. निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी निविदा उघडण्याच्यावेळी सर्व माहितीसह हजर राहू शकतील.

७. निविदेतील अटी व शर्ती याबाबत निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा हक्क शासनाने राखून ठेवला आहे.

८. निविदेतील दर हे निविदा स्विकृतीनंतर १ वर्षासाठी अस्तित्वात राहतील. सदर १ वर्ष किंवा पुढील दरकरार होईपर्यंत कायम राहतील. सदर करार केव्हाही संपुष्टात आणण्याचे अथवा त्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार शासनास राहतील.

९. निविदाकारांनी मागणीनुसार मुळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा अपूर्ण सादर केल्याचे आढळल्यास किंवा अपलोड केलेल्या प्रती व मुळ प्रती यामध्ये फरक आढळल्यास सदर निविदा, निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

१०.तांत्रिक निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील व त्या उघडल्यानंतर त्यांची छाननी करुन पात्र व अपात्र उमेदवार विभागण्यात येतील. त्यानंतर अपात्र उमेदवारांच्या निविदा ऑनलाईन नाकारण्यात येतील.

११.सेवा पुरवठादार संस्थेची निवड करताना कर्मचाऱ्यांकरिता किमान वेतन कायद्यानुसार कर्मचाऱ्याकरिता विहित करण्यात आलेले वेतन, सेवा शुल्काचा दर, अनुभव, आर्थिक उलाढाल, तांत्रिक दस्तऐवजांची पुर्तता इत्यादी बाबी विचारात घेऊन व वाटाघाटीद्वारे निविदाधारकाची अंतिम निवड करण्यात येईल.

१२.महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कंत्राटदाराने / पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह देयक सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर रक्कम प्रदान करण्यात येईल.

Scanned with CamScanner

१३. कर्मचाऱ्यांचे मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने / पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करणे आवश्यक राहील.

१४.कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलेल्या पारिश्रमिकाच्या / इतर भत्त्यांच्या धनादेशाची छायांकीत प्रत दर महा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला / पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही.

१५.कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र आहेत.

१६.पुरवठादाराने कामगार कायद्यातील सर्व अटी व शर्तींचे पालन करणे आवश्यक आहे. तसेच सदर कर्मचाऱ्यांसाठी राज्य कामगार विमा योजना, भविष्य निर्वाह निधी इ. नियमानुसार वेळोवेळी भरणा करावयाचा आहे.

१७.कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीच्या दिवशी आवश्यकतेनुसार कंत्राटदाराने / पुरवठादाराने पर्यायी व्यवस्था करुन दिली पाहिजे.

१८. कंत्राटदाराने/ पुरवठादाराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यास दैनंदिन काम करताना काही इजा व हानी झाल्यास संबंधितास नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार/ पुरवठादार याला अदा करावा लागेल. सदर वाहनचालकाच्या सेवेचे तसेच त्यास झालेल्या इजा वा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही. या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्यांचा नियमानुसार विमा उतरविण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.

१९.कंत्राटी कर्मचाऱ्याकडून होणाऱ्या शासकीय मालमत्तेच्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांच्यावर राहील.

२०.करारासाठी झालेला खर्च, मुद्रांक शुल्क आणि इतर सर्व वितरणांसह पुरवठादार करतील.

२१.एल-१ ठरलेल्या पुरवठादार संस्थेने निविदा स्वीकारण्यास असहमती दर्शविल्यास एल-२ सेवापुरवठादार संस्थेने एल-१ संस्थेने सादर केलेल्या दरानुसार/वाटाघाटानुसार लेखी स्वरुपात बंधपत्र दिल्यानंतर त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

२२.काही अपरिहार्य तसेच तांत्रिक कारणामुळे ई-निविदा प्रक्रियेतील वेळापत्रकात बदल केला जाऊ शकतो. त्याबाबतच्या सूचना कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रदर्शित करण्यात येतील.

२३. या कराराशी संबंधित उद्भवलेले कोणतेही विवाद किंवा फरक असल्यास, अपर मुख्य सचिव (नियोजन) , नियोजन विभाग यांच्याकडे पाठविला जाईल, त्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. तसेच निविदा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर संपूष्टात आणण्याचे अधिकारी अपर मुख्य सचिव (नियोजन) यांना राखुन ठेवण्यात आले आहेत.

Scanned with CamScanner

- शिपाई पदाची कामे:-

कार्यालयीन स्वच्छता राखणे, कार्यालयीन टपाल अहवाल व्यवस्थित लावणे, कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने इतर कोणतेही कामे.

- वाहनचालक पदासाठीच्या अटी:

१. वाहनचालक किमान दहावी इयत्ता उत्तीर्ण असावा.
२. नुतनीकरण अद्यावत असलेला जीप, कार व अवजड वाहन चालवण्याचा मोटार वाहन कायद्यांतर्गत आवश्यक असलेला वाहन चालविण्याचा परवाना वाहन चालकाकडे असणे आवश्यक आहे.
३. वाहन चालकाला वाहन चालविण्याचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
४. वाहनचालकाने पोलीस तपासणी अहवाल देणे बंधनकारक आहे. संस्थेतर्फे पुरविण्यात येणारा वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा किंवा प्रवृत्तीचा नसावा.
५. वाहनचालकास वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.
६. वाहनचालक शारिरीकदृष्टया सक्षम असावा. त्याची वागणूक विनम्रतेची आणि सहकार्याची असावी.
७. कार्यालयीन कामकाजाच्या आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त वाहनचालकास काम करणे आवश्यक राहील.
८. आवश्यकता भासल्यास सुट्टीच्या दिवशीही कामावर बोलाविण्यात येईल.
९. वाहन स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे ही कंत्राटी वाहनचालकाची जबाबदारी असेल.
१०. कंत्राटी वाहन चालकास शासकीय कामानिमित्त आवश्यकता भासल्यास मुंबई /बृहन्मुंबई (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीच्या) बाहेरील क्षेत्रात वाहन चालवावे लागेल.)

Scanned with CamScanner

## तांत्रिक निविदा प्रपत्र-अ

टीप:-निविदाकार सर्व आवश्यक माहिती मूळ निविदा फॉर्ममध्ये (प्रपत्र-अ) सादर करतील आणि पुराव्याच्या समर्थनार्थ कागदपत्रे जोडतील.

| | |
|---|---|
| १) | कंपनी/संस्थेचे नाव आणि पत्ता- |
| २) | संपर्क क्रमांक कार्यालय- |
| ३) | १.दुरध्वनी क्रमांक- २. भ्रमणध्वनी- ३.ई-मेल |
| ४) | संस्थाचालकाचे नाव व पूर्ण पत्ता- |
| ५) | संस्थेचे नोंदणी क्रमांक- |
| ६) | संस्थेचा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी क्रमांक- |
| ७) | संस्थेचा ईएसआय नोंदणी क्रमांक- |
| ८) | संस्थेचा वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक- |
| ९) | पॅन क्रमांक |
| १०) | संबंधित संस्था/अर्जदार खालीलपैकी एका कायद्यातंर्गत नोदणीकृत असावी.<br>१. मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम<br>२. भागीदारी संस्था अधिनियम<br>३. सहकारी संस्था अधिनियम<br>४. कंपनी अधिनियम |
| ११) | बँकेचा तपशील- बँक नाव, ब्रँच कोड, खाते प्रकार, बँक खाते क्रमांक, बँक एमआयसीआर कोड, आयएफएससी कोड, बँकेचा दुरध्वनी क्रमांक |
| १२) | त्यांच्या बँकर्सकडून देण्यात येणारे पत पुरवठा प्रमाणपत्र. किमान रु.५,००,०००/- |
| १३) | मागील ३ वर्षाच्या वर्षनिहाय उलाढालीची सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र (वित्तीय वर्ष २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३) |
| १४) | मागील ३ वर्षाच्या आयकर विवरणपत्राची प्रत (वित्तीय वर्ष २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३) |
| १५) | अनुभव एकुण वर्षामध्ये (मागील तीन वर्षाच्या सन २०२०-२१,२०२१-२२,२०२२-२३ या कालावधीत सेवा पुरविलेल्या आस्थापनांचे/कार्यालयांचे नाव व पत्ते मनुष्यबळ पुरवठा केलेल्या संख्येसह) |
| १६) | संस्थेच्या प्रतिनिधीचे नाव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक |
| १७) | कंत्राटी कामगार अधिनियमाच्या अंतर्गत कंत्राटी कामगाराच्या कामासाठी कामगार आयुक्तांकडील परवान्याचा क्रमांक व वैधता कालावधी.(प्रत जोडावी) |
| १८) | आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार महानगर पालिका क्षेत्रातील क्षेत्रातील नोंदणी प्रमाणपत्र. |

तांत्रिक निविदेतील सर्व पृष्ठे वरीलप्रमाणे अनुक्रमित असावी. सदर तांत्रिक निविदेसोबत निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम ऑनलाईन भरणा केल्याची प्रत जोडावी.

मी निविदा दस्तऐवजांचे सर्व नियम आणि अटी वाचल्या आहेत आणि मी त्यांचे पालन करीन.

स्वाक्षरीकत्याचे नाव व तपशील स्वाक्षरी

Scanned with CamScanner

आर्थिक निविदेकरिता अटी व शर्ती:-

ठि

**<u>वाहनचालक पदांकरिता आर्थिक निविदा (परिशिष्ट-1)</u>**

| अ.क्र. | बाब | दर रुपये |
|---|---|---|
| 1 | मुळ वेतन (दिवसाचा कामकाजाचा कालावधी ९ तास ) | |
| 2. | विशेष/महागाई भत्ता | |
| 3. | दररोजच्या ९ तासांपेक्षा जास्त काम झाल्यास शासनाच्या प्रचलित दराने अतिकालिक भत्ता वाहनचालकास देय राहील (रु.40/-) | |
| 4. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीबाहेर जावे लागल्यास वाहनचालकाच्या भत्त्याचा दर | |
| 5 | वाहनचालकास रात्री 10.00 वा.नंतर थांबावे लागल्यास त्याच्या जेवणाच्या भत्त्याचा दर | |
| 6. | वाहनचालकास रात्री 11.00 वा.नंतर थांबावे लागल्यास त्याच्या घरी जाण्याच्या प्रवास भत्त्याचा दर | |
| 7. | **<u>कामगार कायद्यातील तरतूदीनुसार भरावयाच्या अनिवार्य रक्कम.</u>**<br>कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (PF) | |
| 8. | राज्य कामगार विमा योजना (ESIS) | |
| 9. | व्यवसायकर | |
| 10. | घरभाडे भत्ता | |
| 11. | सुट्टयांच्या दिवशी केलेले काम | |
| 12. | कंत्राटदार/ पुरवठादाराचे प्रशासनिक सेवा खर्च (Firms Administrative service Charges) | |
| | **एकूण** | |

बाह्ययंत्रणेद्वारे वाहनचालकाची पदाची कामे करुन घेण्यासाठी मागविलेल्या दरपत्रकातील अटी/शर्ती या संस्थेस मान्य असून वरील जोडपत्र-१ मधील माहिती सत्य आहे.

**दिनांक :** **स्वाक्षरी व शिक्का**

**ठिकाण :**

Scanned with CamScanner

## शिपाई पदांकरिता आर्थिक निविदा (परिशिष्ट-२)

| | |
|---|---|
| पुरवठादार संस्थेचे नाव | |
| नोंदणी क्रमांक | |
| किमान वेतन कायद्यानुसार वेतन व इतर अनुषंगीक भत्ते (एकुण रक्कम) | |
| प्रति महिना प्रति व्यक्ती सेवा शुल्क | |
| एकुण | |

१. शिपाई यांचे दरमहा किमान वेतन कायद्यानुसार वेतन, इतर अनुषंगीक भत्ते व पुरवठादाराने प्रति शिपाई प्रतिमाह सेवा शुल्क रक्कम रुपये मध्ये नमूद करावी. टक्केवारी मध्ये नमूद केल्यास निविदा नाकारण्यात येईल.

२. वरील तांत्रिक निविदा व आर्थिक निविदा स्वतंत्रपणे सादर करण्यात यावे.

बाह्ययंत्रणेद्वारे शिपाई पदाची कामे करुन घेण्यासाठी मागविलेल्या दरपत्रकातील अटी/शर्ती या संस्थेस मान्य असून वरील जोडपत्र-२ मधील माहिती सत्य आहे.

स्वाक्षरी व शिक्का

दिनांक :

ठिकाण :

Scanned with CamScanner

(कंपनी/संस्थेच्या लेटरहेडवर प्रमाणपत्र देणे)

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या संस्थेच्या संबंधित पदाधिकाऱ्यांचे नातेसंबंधातील जवळचे नातेवाईक (नातेवाईकांच्या व्याख्येनुसार) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ या कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत नाही. तसेच आमच्या संस्थेने यापूर्वी शासकीय कार्यालयांना मनुष्यबळ सेवा पुरविली मात्र आमच्या संस्थेविरोधात कोणतीही तक्रार शासकीय कार्यालयांना प्राप्त झाली नाही. आमच्या संस्थेबाबत शासकीय कार्यालयांना तक्रार प्राप्त झाली असेल व त्या तक्रारीत तथ्य असेल वा त्या तक्रारीचे रितसर निवारण झालेले नसेल तर आमच्या संस्थेला नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही, याची आम्हाला माहिती आहे.

आमच्या संस्था/कंपनीच्या पदाधिकाऱ्यांची अन्य संस्था असल्यास त्या संस्थेबाबत किंवा या संस्थेच्या/कंपनीच्या पदाधिकाऱ्यांच्या जवळच्या नातेवाईकाची वा भागीदाराची अन्य संस्था असेल तर अशा संस्थेबाबत/पदाधिकारीबाबत शासकीय कार्यालयाला तक्रार प्राप्त झाली असेल व त्या तक्रारीत तथ्य असेल वा त्या तक्रारीचे रितसर निवारण झालेले नसेल तर आमच्या संस्थेला निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही, याची आम्हाला माहिती आहे.

सही

नाव

पदनाम

संस्थेचा शिक्का

Scanned with CamScanner